# महा वितरण विद्युत वार्ता

वर्ष ५ वे : अंक ३ सप्टेंबर – २००९




**श्री. अजय मेहता**

व्यवस्थापकीय संचालक

# हितगुज

‘ पायाभूत विकास आराखडा,
गावठाण फिडर, सिंगल फेजींग, एपीडीआरपी,
राजीव गांधी इत्यादी सर्व प्रकल्प आपल्यासाठी महत्वाचे आहेत.
यामुळे ग्राहकांना अपेक्षित दर्जेदार सेवा देणे शक्य होणार आहे.
हे प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी केवळ कंत्राटदारांची नाही,
तर आपली प्रत्येकाची आहे,
हे लक्षात ठेवून कामाला लागा. ... ’

आपल्या सर्वांना कल्पना आहे की, आपल्या ग्राहकांना अपेक्षित दर्जेदार सेवा देणे हे आपल्या समोरील खूप महत्त्वाचे आव्हान आहे. हे आव्हान आपण स्वीकारलेले असून ह्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रकल्प आपण राबवित आहोत.

राज्यात विजेच्या मागणीत आणि पुरवठ्यात तफावत असून ती कमी करण्यासाठी वीज निर्मितीची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. तसे नियोजन आपल्या महानिर्मिती या सहकारी कंपनीने केलेलेही आहे. परंतु नियोजनापासून प्रकल्प उभारणीसाठी लागणाऱ्या सर्व मंजुऱ्या मिळाल्या तरी प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीला किमान ३ ते ४ वर्षांचा कालावधी लागतो. म्हणूनच आपण महावितरणमध्ये विजेची मागणी नियंत्रित करून ग्राहकांना भारनियमनात दिलासा देण्यासाठी सिंगल फेजिंग व गावठाणांसाठी स्वतंत्र फिडरच्या कमी कालावधीत पूर्ण होणाऱ्या योजना आखल्या. सिंगल फेजिंगची कामे आता जवळपास पूर्ण झालेली असली तरी गावठाणांसाठी स्वतंत्र फिडर या योजनेची बरीच कामे बाकी आहेत. या योजनेत अद्याप १० हजार २८८ गावांतील कामे बाकी आहेत. योजनेचे उद्दिष्ट १६ हजार ३०९ गावांचे असून त्यापैकी आतापर्यन्त ६ हजार ६०१ एवढी गावे झालेली आहेत. सिंगल फेजिंग व गावठाणांसाठी स्वतंत्र फिडर या योजनांमुळे सुमारे २० हजार गावांतील भारनियमन थेट निम्म्यावर यायला मदत झालेली आहे. विजेच्या मागणीचे नियंत्रणही या योजनांमुळे शक्य झालेले आहे. योजनेची उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण व्हायला हवीत.

दारिद्र्य रेषेखालील घरकुलांना केवळ १५ रुपयांत जोडणी देण्याचा राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेचा कार्यक्रम केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे. आपल्या राज्यात अशा सुमारे १८ लाख ७६ हजार दारिद्र्यरेषेखालील घरकुलांना वीज जोडण्या देण्याचे लक्ष्य आपण ठरविलेले आहे. आतापर्यन्त ३०० गांवे आणि ३ लाख २७ हजार घरकुलांना आपण जोडण्या दिलेल्या आहेत. अजून यात भरपूर काम व्हायचे आहे. गोरगरीबांच्या घरात १५ रुपयांत जोडणी देण्याचा हा कार्यक्रम आपल्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.

राबविले जाणारे सर्वच प्रकल्प आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत. परंतु यातही सुमारे ११ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा राज्याच्या विद्युत क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडविणारा पायाभूत आराखडा विकास कार्यक्रम हा आपला महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. आपल्याला कल्पना आहे की, आपली सध्याची वितरण प्रणाली १० ते ११ हजार मे.वॅ. विजेचे वितरण करण्यासाठी सक्षम आहे. यंत्रणा अतिभारित असल्याने त्यातही अडचणी आहेत. येत्या २–३ वर्षांत राज्यात विविध स्त्रोतांकडून आणखी सुमारे १० हजार मे.वॅ.वीज उपलब्ध होण्याची शक्यता आहे. येऊ घातलेले विद्युत निर्मिती प्रकल्प पाहता ही उपलब्धता वाढतच जाणार आहे. या परिस्थितीत या विजेचे व्यवस्थित वहन होऊन ग्राहकांना पुरेशा दाबाने व्यवस्थित वीज मिळण्यासाठी अस्तित्वात असलेल्या वितरण प्रणालीचे नुतनीकरण आणि आणखी पुरेशी नवीन वितरण प्रणाली उभी राहणे अत्यंत गरजेचे आहे. भविष्यातील ही गरज लक्षात घेऊन या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमात गंजलेले, जुनाट खांब बदलण्यापासून ३३/११ केव्हीची उपकेंद्रे उभारण्यापर्यन्त अनेक प्रकारची कामे आपण हाती घेतलेली आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यन्त महाराष्ट्रात ३३/११ केव्हीची सुमारे १८८९ उपकेंद्रे उभारण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत केवळ २ वर्षांच्या कालावधीत आपण थोडी थोडकी नाही तर ५५६ उपकेंद्रे उभी करणार आहोत. प्रणाली सुधारणांची रोहीत्रे उभारणे, वाहिन्या टाकणे ही सर्व कामेही अशाच मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहेत. राज्यात सर्वत्र ही कामे सुरू झालेली आहेत.

एवढा मोठा प्रकल्प राबवितांना यात अडचणीही नक्कीच येतील. काही ठिकाणी उपकेंद्रांसाठी जागेचा, वाहिन्यांसाठी मार्गिका (Right of way) असे प्रश्न निर्माण होऊ शकतात. परंतु हे प्रश्न स्थानिक अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन सोडवायला हवे. कामाची प्रचंड व्याप्ती लक्षात घेता ही कामे आपल्याला करणे अवघड असल्यामुळे आपण ती टर्न की तत्वावर दिलेली आहेत. ही सर्व कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण व्हायची असतील तर ही कामे पूर्ण करण्याची जबाबदारी केवळ कंत्राटदाराची नाही तर आपल्यापैकी प्रत्येकाची आहे, याची जाणीव ठेवावी लागेल. कंत्राटदार हा या कामातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. प्रकल्प पूर्ण होऊन त्याचे आपल्याकडे हस्तांतरण झाल्यानंतरच आपली जबाबदारी आहे, असे नाही तर प्रारंभापासूनच हा प्रकल्प आपला आहे, अशी भूमिका असावी. केवळ ग्राहकांना चांगल्या दाबाने पुरेशी वीज देता यावी, वितरण हानी कमी व्हावी, नवीन जोडण्या देता याव्यात यासाठी कर्जे घेऊन आपण प्रकल्प राबवित आहोत. विजेच्या वाढत्या मागणीची पूर्तता करून विश्वासार्ह सेवा देऊन अंतिमत: ग्राहकांचे समाधान हे ध्येय साध्य व्हावे याच हेतूने वितरण यंत्रणा सक्षम करण्याचे सारे प्रयत्न सुरू आहेत.

या आपल्या विविध प्रकल्पांमुळे भविष्यातील गरजा भागविल्या जाणार आहेत. राज्याच्या विकासाची गती आणखी वाढविण्यासाठी हे सर्व प्रकल्प व्यवस्थितपणे राबविले जायला हवेत. राज्याच्या विकासात मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याची संधी यामुळे आपल्याला प्रत्येकाला मिळालेली आहे. आपण सर्वांनी सामुदायीकपणे ही जबाबदारी उचलून संधीचे सोने करावे, असे माझे सर्वांना आवाहन आहे.

**अजय मेहता,** व्यवस्थापकीय संचालक

# गौरव

## स्नेहा अहिरिरावचे दहावी परीक्षेतील सुयश



कु. स्नेहा अहिरराव हिला दहावीच्या परीक्षेत ९२.४६ टक्के गुण मिळाले. एकूण ६५० गुणांपैकी तिला ६०१ गुण मिळाले. तिने गणितामध्ये १५० पैकी १४५ गुण, विज्ञान आणि तंत्रज्ञानमध्ये १०० पैकी ९१ गुण प्राप्त केले. नाशिक परिमंडलातील चोपडा उपविभागातील उच्चस्तर लिपिक श्री. अनिल अहिरराव यांची ती कन्या आहे.

## शेख रहीम शेख बिबन फार्मसी परीक्षेत सर्वप्रथम



नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठातून शेख रहीम शेख बिबन याने बी.फार्मसी चौथ्या वर्षाच्या पदवी परीक्षेत सर्वप्रथम येण्याचा मान पटकाविला आहे. त्याला एकूण १३०० गुणांपैकी १०४७ गुण मिळाले आहेत. तो नांदेड येथील फार्मसी महाविद्यालयात शिकत आहे. नांदेड भांडार व्यवस्थापन मंडल कार्यालयातील शिपाई श्रीमती शमीम बेगम शेख बिबन यांचा तो मुलगा आहे.

## आनंद व लक्ष्मी दराडे बंधुभगिनींचे ब्लॅक बेल्ट परीक्षेतील यश



आनंद दराडे



लक्ष्मी दराडे

बार्शी येथील ज्योतिर्लिंग स्पोर्टस् क्लबने महाबळेश्वर येथे आयोजित केलेल्या व्यक्तिमत्व विकास शिबिरात चि. आनंद व कु. लक्ष्मी दराडे यांनी ब्लॅक बेल्ट परीक्षा उत्तीर्ण केली. या शिबिरात चि. आनंदची उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून निवड झाली. त्याला सहभागी प्रमाणपत्र व प्रथम ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या कॅम्पमध्ये एकूण १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. बार्शी शहर उपविभागातील वरिष्ठ तंत्रज्ञ श्री. एस.ई. दराडे यांची चि. आनंद व कु. लक्ष्मी ही मुले आहेत.

## सागर कांबळे याची राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी निवड



डेहराडून (उत्तरांचल) येथे झालेल्या १९ वर्षाखालील वयोगटातील राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत राज्याचे सांघिकरित्या प्रतिनिधीत्व करण्यासाठी चि. सागर कांबळे याची निवड झाली होती. त्याच्या या कौतुकास्पद सहभागाबद्दल अहमदनगर महानगरपालिकेचे महापौर श्री. संग्राम जगताप यांनी चि. सागरचे अभिनंदन केले आहे. अहमदनगर ग्रामीण उपविभागातील कनिष्ठ अभियंता श्री. कैलास कांबळे यांचा तो मुलगा आहे.

## प्रकाश डब्बावार यांना 'शतकवीर पुरस्कार'



महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीतर्फे दिला जाणारा 'शतकवीर पुरस्कार' श्री. प्रकाश डब्बावार यांना नुकताच देण्यात आला. श्री. डब्बावार हे यवतमाळच्या महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे गेल्या १२ वर्षापासून जिल्हा कार्याध्यक्ष आहेत. ते नेत्रदान, देहदान, हुंडाबळी, आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह चळवळींत सहभागी असतात. श्री. डब्बावार हे यवतमाळ मंडलात उच्चस्तर लिपिक म्हणून कार्यरत आहेत.

## जीव धोक्यात घालून दुस-यांना मदत करणारा कनिष्ठ तंत्रज्ञ शिवाजी कदम



महावितरण विजेच्या क्षेत्रात काम करणारी कंपनी. राज्याच्या विकासाला चालना देण्यासाठी कटीबध्द. परंतु या कंपनीतील कर्मचारी, अधिकारी आपले कार्यालयीन काम सांभाळून वेगवेगळ्या क्षेत्रात सामाजिक काम करतात. हे कर्मचारी तेथे स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतात. पर्यायाने महावितरणचाही नावलौकिक करतात. अशा अनेक कर्मचा-यांपैकीच कनिष्ठ तंत्रज्ञ श्री. शिवाजी कदम. कोल्हापूर ग्रामीण विभाग -१ मधील शाहूवाडी सारख्या दुर्गम व डोंगराळ तालुक्यात काम करणारा महावितरणचा जनमित्र.

विशाळगड परिसरामधील खोल द-यांमध्ये गाय-म्हैस घसरून पडली, काही अपघात झाले, कोणी अडचणीत असेल तर श्री. कदम यांचा नेहमीचाच मदत करण्याचा नावलौकिक आहे.

१९९९ मध्ये जुन्नर येथील हांडे कुटुंबातील ४ व्यक्तींनी विशाळगडच्या टकमक टोकांवरून आत्महत्या केली होती. त्यावेळी त्या व्यक्तींचे मृतदेह सापडत नव्हते. शासनाच्या हेलिकॉप्टरद्वारा केलेल्या शोध मोहिमेमध्येसुध्दा हे मृतदेह आढळले नव्हते. . मात्र श्री. कदम यांनी दोरखंडाच्या सहाय्याने सुमारे ५०० फूट खोल आणि उभा कडा असलेल्या दरीत उतरून हे मृतदेह शोधून काढले. त्यावेळी हे मृतदेह शोधण्यासाठी त्यांनी अख्खी रात्र या दरीत घालविली होती. अलीकडे जुलै २००९ मध्ये विशाळगडच्या सुमारे १५०० फूट खोल दरीमध्ये ११ व्यक्ती असलेली जीप कोसळली. यामध्ये ९ जण जागेवरच मृत्युमूखी पडले. दोघे बेशुध्द अवस्थेत जखमी होऊन दरीमध्ये पडून होते. स्थानिक लोकांनी पोलिसांबरोबरच श्री. कदम यांना अपघाताची माहिती दिली. श्री. कदम यांनी तात्काळ तिकडे धाव घेतली. आणि ते या खोल दरीत उतरले. जिवंत असलेल्या व्यक्तीला श्री. कदम यांनी प्रथम नेलेले पाणी दिले आणि त्याला स्वतःच्या पाठीवर घेतले. या अवघड दरीमधून जीवरक्षक पथकांच्या मदतीने त्याला दरीबाहेर काढले.

. अशा गुणवंत व धाडसी कर्मचा-यांचा सत्कार मुख्य अभियंता श्री. आर.जी. बुंदिले व कार्यकारी अभियंता श्री. जयसिंगराव निकम यांच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी करण्यात आला.

## सुभाषराव पिसे यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार



राज्य शासनाकडून प्रतिवर्षी क्रीडाक्षेत्रातील नामवंत क्रीडा कार्यकर्ते व खेळाडूंना दिला जाणारा सन २००६-०७ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्कार यावर्षी श्री. सुभाषराव पिसे यांना देण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल मा. एस.सी.जमीर यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. स्मृतिचिन्ह, मानपत्र व रु. १ लाख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वीही त्यांना सन १९८७-८८ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा कार्यकर्ता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते.

१९६०-७० मध्ये सलग १० वर्षे अखिल भारतीय कबड्डी स्पर्धांत खुल्या गटात खेळाडू म्हणून ते सहभागी होते. ते राज्य पातळीवर व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कबड्डी पंच परीक्षा पास झाले. मुख्यालयाच्या कामगार विभागातील उपकामगार अधिकारी (क्रीडा) श्री. सुनील पिसे यांचे ते वडील आहेत.

## एमईआरसीच्या सदस्यपदी विजय सोनवणे यांची नियुक्ती



श्री. विजय सोनवणे यांच्या शपथविधी प्रसंगी शुभेच्छा देताना ऊर्जामंत्री ना. सुनील तटकरे. याप्रसंगी उपस्थित प्रभारी ऊर्जा सचिव श्री. सुब्रत रथो, आयोगाचे अध्यक्ष श्री. व्ही. पी. राजा, सदस्य श्री. सुभाष कुलकर्णी आणि सौ. कल्पना विजय सोनवणे छायाचित्रात दिसत आहेत.

संचालक (प्रकल्प) श्री. विजय सोनवणे यांची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला. श्री सोनवणे १९७६ साली तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये सहाय्यक अभियंता म्हणून थेट रूजू झाले होते. त्यानंतर त्यांनी केलेली प्रगती सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.

श्री. सोनवणे यांची विद्युत नियामक अयोगावरील नियुक्ती राज्यशासनाने केली आहे. सह्याद्री अतिथी गृहात संपन्न झालेल्या समारंभात ऊर्जामंत्री ना. सुनील तटकरे यांनी श्री. सोनवणे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. याप्रसंगी प्रभारी ऊर्जा सचिव श्री. सुब्रत रथो, व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंग, संचालक (संचालन) श्री. शरद दाभाडे आदि मान्यवर उपस्थित होते.

मूळचे जळगाव जिल्ह्यातील रहिवासी असलेले श्री. सोनवणे यांनी पुणे विद्यापीठातून विद्युत अभियांत्रिकीतील पदव्युत्तर पदवी संपादन केली. कार्यकारी अभियंता ते मुख्य अभियंता पदांवरील विविध विभागांतील यशस्वी कारकिर्दीनंतर ऑगस्ट २००५ साली त्यांची कार्यकारी संचालक पदावर नियुक्ती झाली. त्यानंतर मार्च २००९ पासून ते संचालक (प्रकल्प) या पदावर कार्यरत होते. विद्युत क्षेत्रातील तज्ञ समजले जाणारे श्री. सोनवणे यांनी जर्मनी, अमेरिका, कोरिया इत्यांदी देशांचा दौरा केलेला असून अनेक महत्त्वाच्या परिसंवादामध्ये महावितरणचे प्रतिनिधीत्व केलेले आहे.

## व्यवस्थापकीय संचालकांकडून वसमत उपविभागाची पाहणी

व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता यांनी हिंगोली विभागातील वसमत उपविभागाची नुकतीच पाहणी केली.श्री. मेहता यांनी यावेळी उपविभागाच्या कामाचा आढावा घेतला. वीजहानी कमी करावी. शून्य ते तीस युनिट वीज देयक असलेल्या ग्राहकांची तपासणी करावी व वीजचोरी मोहीम सातत्याने राबवावी, असे निदेश त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे, हिंगोली मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. रवींद्र वानखेडे, कार्यकारी अभियंता श्री. दिपक कुरे, श्री. सुधीर पारगुंडे, सहाय्यक अभियंता श्री. हरीनाथ कुरल्लू व इतर अधिकारी , कर्मचारी हजर होते.

## पाणी,अन्न आणि वीज वाचवा - स्वातंत्र्यदिनी व्यवस्थापकीय संचालकांचे आवाहन



स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणानंतर उपस्थित अधिकाऱ्यांचे अभिवादन स्वीकारताना व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता

संपूर्ण देशावर दुष्काळाचे सावट असल्यामुळे प्रत्येकाने पाणी, अन्न - धान्य आणि वीज यांची बचत करावी, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता यांनी केले आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त 'प्रकाशगड' येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

भारताचा ६३ वा स्वातंत्र्यदिन 'प्रकाशगड' येथे उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य समारंभात श्री. मेहता यांनी ध्वजारोहण केले. त्यानंतर झालेल्या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले की, स्वातंत्र्यदिन साजरा करतांना आपण देशासाठी, समाजासाठी आतापर्यंत काय केले आणि भविष्यात काय करणार आहोत, याबाबत विचार,आत्मपरिक्षण केले पाहिजे. सध्या देशासमोर दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. वैयक्तिक जबाबदारी निभावून आपण त्याचा यशस्वी मुकाबला करू शकतो. त्यासाठी आपण सर्वांनी पाणी, अन्न आणि वीज यांची बचत केली पाहिजे. तसेच आणखी कार्यक्षमतेने काम करुन कंपनी आणि देशाच्या प्रगतीत हातभार लावला पाहिजे.

यावेळी महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि प्रभारी ऊर्जासचिव श्री. सुब्रत रथो, महावितरणचे तत्कालीन संचालक (प्रकल्प) श्री. विजय सोनवणे, संचालक (संचालन) श्री. शरद दाभाडे, महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री. गुलाबसिंग गिरासे, महावितरणचे कार्यकारी संचालक सर्वश्री राहुल गोवर्धन, रमेशसिंह गौतम, एम.के.देवरे तसेच मुख्य अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## टाकळी (कुंभकर्ण) उपकेंद्राची व्यवस्थापकीय संचालकांकडून पहाणी



व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता यांनी टाकळी (कुंभकर्ण) ता.जि. परभणी येथे नव्याने उभारण्यात येत असलेल्या ३३ किव्हो उपकेंद्राच्या कामाची नुकतीच पाहणी केली. कार्यकारी संचालक श्री उत्तम झाल्टे यांच्याकडून उपकेंद्रातील अर्थींगच्या व इतर कामाची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली. श्री. मेहता यांनी तेथील जनमित्रांशी संवाद साधून त्यांची आस्थेने चौकशी केली आणि ते करीत असलेल्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी अधीक्षक अभियंता श्री. अ. अ. अग्रवाल, कार्यकारी अभियंता श्री. एम.ए. बेग इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे यांच्याकडून टाकळी (कुंभकर्ण) उपकेंद्रातील आर्थिंगची माहिती घेताना व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता.

# गौरव



## गौरव पालटशहाला दहावीत ९५.५३ टक्के

चि. गौरव पालटशहा याला दहावीच्या परीक्षेत ९५.५३ टक्के गुण मिळाले. एकूण ६५० गुणांपैकी त्याला ६२१ गुण मिळाले. त्यांने सामाजिक शास्त्रे या विषयात १०० पैकी १०० गणितामध्ये १५० पैकी १४९ , विज्ञान आणि तंत्रज्ञानमध्ये १०० पैकी ९८ गुण प्राप्त केले. नाशिक परिमंडलाच्या चोपडा उपविभागातील निम्नस्तर लिपिक श्री. राजेश पालटशहा यांचा तो मुलगा आहे.



## प्राजक्ता लोखंडेला दहावीत ९३.६९ टक्के

कु. प्राजक्ता लोखंडेला दहावीच्या परीक्षेत ९३.६९ टक्के गुण मिळाले. एकूण ६५० गुणांपैकी तिला ६०९ गुण मिळाले. तिने गणितामध्ये १५० पैकी १४६ गुण, विज्ञान आणि तंत्रज्ञानमध्ये १०० पैकी ९९ गुण प्राप्त केले. नागपूर प्रादेशिक विभागाचे कार्यकारी संचालक यांच्या कार्यालयातील उच्चस्तर लिपिक श्रीमती माधुरी लोखंडे यांची ती कन्या आहे.



## मधुरा मोहिदेकरचे दहावीच्या परीक्षेतील यश

कु. मधुरा मोहिदेकर हिला दहावीच्या परीक्षेत ९१.६९ टक्के गुण मिळाले. एकूण ६५० गुणांपैकी तिला ५९६ गुण मिळाले. तिने गणितामध्ये १५० पैकी १५० गुण, विज्ञान आणि तंत्रज्ञानमध्ये १०० पैकी ९३ गुण प्राप्त केले. अमरावती शहर उपविभाग –२ मधील उच्चस्तर लिपिक श्री. रविंद्र मोहिदेकर यांची ती कन्या आहे.



## प्रियंका गुर्जर सी.ई.टी. परीक्षेत राज्यात १२ वी

एम.एच.टी.सी.ई.टी –२००९ च्या परीक्षेत कुमारी प्रियंका गुर्जर हिने मागासवर्गीय प्रवर्गातून गुणवत्ता यादीत ४ था क्रमांक तर महाराष्ट्र राज्यात १२ वा क्रमांक पटकाविला आहे. तिच्या गुणवत्तेमुळे मुंबई येथील के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयात तिला एम.बी.बी.एस. ला प्रवेश मिळाला. मुख्यालयाच्या एपीडीआरपी विभागातील अधीक्षक अभियंता श्री. वसंत गुर्जर यांची ती कन्या आहे.



## हृषिकेश परांजपेची आय आय टी साठी निवड

पुणे स्थापत्य विभागातील उपकार्यकारी अभियंता श्री. चिंतामणी परांजपे यांचा मुलगा कु. हृषिकेश परांजपे याची आयआयटी, खरगपूरसाठी नुकतीच निवड झाली आहे. यापूर्वी त्याची किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजनेद्वारे मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली होती.



## अमोल अंबिलवादे याचे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला प्रयाण

चि. अमोल अंबिलवादे एम.एस (संगणक शास्त्र) या उच्च शिक्षणासाठी नुकताच अमेरिकेला रवाना झाला. अमेरिकेच्या बिंगहॅमटन येथील स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ न्युयॉर्क या विद्यापीठात त्याला प्रवेश मिळाला आहे. चि. अमोलने पुणे येथील एम.आय.टी. महाविद्यालयातून संगणक शास्त्रातील पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली आहे. महावितरणमध्ये असिस्टंट प्रोग्रॅमर या पदावर त्यांची नियुक्ती झाली होती. परंतु त्याला उच्च शिक्षण घ्यावयाचे असल्याने तो या पदावर रूजू झाला नाही. अमरावती मंडलातील उपव्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) डॉ. चंद्रकांत अंबिलवादे यांचा तो मुलगा आहे.





# संवाद मोहिमेस उत्साहात प्रारंभ कर्मचाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद

जनमित्र, ऑपरेटर, बिलिंग स्टाफ, शिपाई यांचा जनतेशी नेहमी संबंध येतो. या आपल्या कर्मचाऱ्यांनी ग्राहकांशी वागताना विशेष काळजी घ्यायला हवी. त्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांच्या मदतीने संवाद मोहीम राबविण्याचे आदेश मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी मुख्यालयात झालेल्या जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले. त्यानुसार सर्व परिमंडळांतर्गत संवाद मोहीम सुरू करण्यात आली असून या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्राहकांना सौजन्याची वागणूक, आणखी चांगली सेवा देऊन महावितरणची जनमानसातील प्रतिमा आणखी उंचावण्यासाठी ही मोहीम सुरू करण्यात आलेली आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत विविध परिमंडळात घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा हा संक्षिप्त गोषवारा –

### लातूर परिमंडल :

लातूर परिमंडलात या मोहिमेचा शुभारंभ मुख्य अभियंता श्री. रामराव मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता श्री. किशोर शेगोकार होते. यावेळी मार्गदर्शन करतांना श्री. मुंडे म्हणाले की, ग्राहकांशी सौजन्याने वागून त्यांचे काम वेळेत पूर्ण करण्यातूनच महावितरणची प्रतिमा आणखी चांगली होईल. या कार्याक्रमास १०० हून अधिक जनमित्र तसेच अधिकारी, अभियंते, व कर्मचारी उपस्थित होते. उस्मानाबाद मंडलात झालेल्या कार्यक्रमात अधीक्षक अभियंता श्री. सुहास रंगारी यांनी मार्गदर्शन केले. शिपाई, टेलीफोन ऑपरेटर, बिलींग क्लार्क व जनमित्र यांच्याकडून ग्राहकांना चांगल्या वागणुकीची रास्त अपेक्षा असते. स्पर्धेच्या युगात जुन्या ग्राहकांना टिकवून ठेवणे आणि नवीन ग्राहकांना आकर्षित करणे आवश्यक आहे, असे श्री रंगारी यावेळी म्हणाले. निलंगा, उद्‌गीर आणि तूळजापूर विभागीय कार्यालयांतही संवाद मोहिमेनिमित्त कार्यक्रम घेण्यात आले. या ठिकाणी अनुक्रमे कार्यकारी अभियंते सर्वश्री जी.बी. पानकर, बी.बी. देशमुख आणि स. शा. तायडे यांनी मार्गदर्शन केले. या सर्व ठिकाणी जनसंपर्क अधिकारी श्री. शिवाजी इंद्राळे यांनी मोहिमेची पार्श्वभूमी विषद करून मार्गदर्शन केले.



विशेष संवाद मोहिमेतीचे दिप प्रज्वलन करून उद्‌घाटन करताना लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री रामराव मुंडे व लातूर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. किशोर शेगोकार, जनसंपर्क अधिकारी श्री. शिवाजी इंद्राळे.

### औरंगाबाद परिमंडल :

औरंगाबाद परिमंडलात संवाद मोहिमेचा शुभारंभ औरंगाबाद ग्रामीण उपविभाग –२ येथे करण्यात आला. कर्मचाऱ्यांनी ग्राहकांच्या तक्रारी समजून घेऊन त्यांना सौजन्यपूर्ण वागणूक द्यावी, तक्रारी त्वरित सोडवून ग्राहकांच्या मनात सद्‌भावना निर्माण करावी, असे आवाहन औरंगाबाद शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.श्याम धन्तोले यांनी यावेळी केले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री.सोमनाथ पवार , व्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. प्रकाश अहिरे, कार्यकारी अभियंते सर्वश्री. चंद्रकिशोर हुमणे , संजय खंदारे, व्यवस्थापक श्री. सतीश गडप्पा, उपव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. आनंद रोडे, आदी उपस्थित होते. प्रारंभी उपमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. अनिल कांबळे यांनी मोहिमेची माहिती दिली.

- स्वच्छता, सौजन्य आणि तात्काळ प्रतिसाद ही त्रिसूत्री अमलात आणा.
- ग्राहक हा आपला देवच आहे.

### पुणे परिमंडल :

पुणे परिमंडलातील संवाद मोहिमेचा शुभारंभ मुख्य अभियंता श्री. एस.पी. नागटिळक यांनी केला. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. बाबासाहेब जाधव, व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) श्री. हरीभाऊ साळुंखे यांच्यासह अनेक अधिकारी अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस उपमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. चंद्रकांत गुरव यांनी मोहिमेची पार्श्वभूमी आणि महत्त्व विषद केले.

- ग्राहकांमुळे कंपनी आणि कंपनीमुळे आपण आहोत.
- तक्रारींचे तात्काळ निवारण करून ग्राहकांमध्ये सद्‌भावना निर्माण करा.
- कार्यालय व सभोवतालचा परिसरही स्वच्छ ठेवा.

### नागपूर शहर परिमंडल :

नागपूर शहर परिमंडलात आयोजित कार्यक्रमात शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. एम. एस. केळे यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले दूरध्वनीचा रिसीव्हर उचलून ठेवणे , मोबाईल बंद असणे, तक्रार केल्यास नीट उत्तरे न मिळणे अशा ग्राहकांच्या तक्रारी असतात. या तक्रारी बंद व्हायला हव्यात. यावेळी कार्यकारी अभियंता सर्वश्री. सुरेश गंधेवार, अरविंद भादिकर व डी.एस. अंबादे यांनीही मार्गदर्शन केले. व्यवस्थापक (क) श्री. दिवाकर बोकाडे, कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत दानोलीकर व श्री. यू.जी. जीवने आदी या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री.एम.आर.मराठे यांनी केले. प्रारंभी उपमुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. सदाशिव केराम यांनी उपस्थितांना संवाद मोहिमेची माहिती दिली.



अकोला ग्रामीण उपविभागातील संवाद मोहिम कार्यक्रमात उपस्थित असलेले कर्मचारी.

### अमरावती परिमंडल :

संवाद मोहिमेअंतर्गत अमरावती परिमंडलातील अकोला ग्रामीण उपविभागात आयोजित एका कार्यक्रमात कार्यकारी अभियंता श्री. चंद्रशेखर मानकर यांनी जनमित्र व इतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. अकोला शहर विभागातील वितळतार पाचारण केंद्र १२ तसेच अमरावती उपविभाग क्र.०१ येथेही संवाद मोहिम राबविण्यात आली. या ठिकाणी अनुक्रमे कार्यकारी अभियंता श्री. एस.व्ही. जलतारे आणि उपकार्यकारी अभियंता श्री. डी.बी. मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम राबविण्यात आली. जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार यांनी संवाद मोहिमेची पार्श्वभूमी समजावून सांगितली.

### कल्याण परिमंडल :

संवाद मोहिमेअंतर्गत कल्याण परिमंडलातील बदलापूर (पूर्व) आणि अंबरनाथ (पश्चिम) या उपविभागांत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महावितरणची प्रतिमा उंचावण्यासाठी कर्मचा–यांनी स्वच्छता, ग्राहकांशी सौजन्यपूर्वक वागणूक, तक्रारींचे विश्लेषण करून त्याची तात्काळ सोडवणूक , ग्राहकांप्रती सहकार्याची भावना या बाबींचा अवलंब करावा,असे आवाहन या कार्यक्रमांद्वारे करण्यात आले. जनसंपर्क अधिकारी श्री. योगेश विटणकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. अंबरनाथ (पश्चिम) येथील कार्यक्रमात उपकार्यकारी अभियंता श्री. अविनाश महाजन यांनी मार्गदर्शन केले.

### भांडूप परिमंडल :

भांडूप परिमंडल मुख्यालय आणि शिळ विभागीय कार्यालयात संवाद मोहिमेअंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड, कार्यकारी अभियंता श्री. दिलीप दोडके, उपकार्यकारी अभियंता श्री. अजित तांबडे आदींनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. शिळ येथे आयोजित कार्यक्रमात नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या मुंब्रा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.सुभाषचंद्र सदामते यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी श्री. आनंद कुमरे यांनी मोहिमेची पार्श्वभूमी विषद केली.

### नाशिक परिमंडल :

मा. व्यवस्थापकीय संचालक यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या संवाद मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुरेश वलेकर यांनी दिले. अधीक्षक अभियंत्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

संवाद मोहिमेतून ग्राहकांशी सकारात्मक संवाद साधणारे सुसंवादक घडतील, असे मत अधीक्षक अभियंता श्री. प्रशांत नेवासकर यांनी अहमदनगर मंडल कार्यालयात आयोजित संवाद मोहिमेच्या कार्यक्रमात व्यक्त केले. यावेळी सहाय्यक अभियंता श्री. संतोष सांगळे, वरिष्ठ सहाय्यक श्री. गोकूळ बिडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ अभियंता श्री. संतोष पटनी यांनी केले.

- ✧ माहितीचा अधिकार कायद्याची गरजच पडणार नाही, अशी पारदर्शकता आणि कार्यतत्परता दाखवा.
- ✧ ग्राहकाशी दूरध्वनीवर बोलताना संवादाची सुरुवात ‘नमस्कार, महावितरणतर्फे मी आपली काय सेवा करू शकतो? ’ अशी आदबशीर करावी.

### जळगाव परिमंडल :

महावितरणची प्रतिमा ग्राहकांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकावर अवलंबून आहे. याची व आपल्या कर्तव्याची, जबाबदारीची जाणीव ठेवावी आणि ग्राहकांना सौजन्यपूर्ण वागणुकीसह चांगली सेवा देण्यास तत्पर राहावे, असे आवाहन जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. विजय सोमकुंवर यांनी केले.

धुळे येथे प्रशिक्षण केंद्रात आयोजित संवाद मोहिमेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. किशोर परदेशी अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत यांनी संवाद मोहिमेची संकल्पना स्पष्ट केली. कार्यक्रमाला कार्यकारी अभियंता सर्वश्री बी. बी. मासूळ, एस. जी. मोरे, व्ही. एम. डाबरे, एस. के. मानसुरी आदींसह जनमित्र, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



अहमदनगर मंडल कार्यालयात संवाद मोहिमेअंतर्गत आयोजित कार्यक्रमात अधीक्षक अभियंता श्री. प्रशांत नेवासकर, जनसंपर्क अधिकारी श्री. निशिकांत राऊत आदी

## नागपूर शहरातील वाठोडा परिसरात ४० मीटरचे वाटप



वाठोडा येथील ग्राहकाचा वीजपुरवठा सुरू करताना कार्यकारी संचालक श्री. अनिल खापर्डे. सोबत मुख्य अभियंता श्री. डी.एस. तलवारे व इतर.

वीज चोरीवर उपाय म्हणून नागपूर शहराच्या वाठोडा परिसरातील ग्राहकांना नंदनवन उपविभागने ४० नवीन वीज जोडण्या दिल्या. कार्यकारी संचालक श्री. अनिल खापर्डे यांच्या हस्ते या जोडण्यांचा शुभारंभ करण्यात आला. ५०० रुपये अनामत रक्कम व ५२ रुपये इतर आकार घेऊन या जोडण्या देण्यात आल्या.

हुक टाकून अवैधरित्या वीज वापर केल्यास चोरीचा गुन्हा दाखल होवून दंड आकारण्यात येतो. हे टाळण्यासाठी अधिकृतरित्या वीज वापरासाठी योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करून सन्मानाने महावितरणचे ग्राहक व्हावे असे आवाहन श्री. अनिल खापर्डे यांनी ग्राहकांना मार्गदर्शन करतांना केले.

शहरातील ग्राहकांना नवीन वीज जोडण्या घेण्यासाठी महावितरणच्या वतीने आवश्यक ते सर्व विद्युत साहित्य पुरविण्यात येईल. तेव्हा जनतेने आपल्या घरासाठी अधिकृतपणे वीज जोडणी घ्यावी, असे आवाहन मुख्य अभियंता श्री. डी.एस. तलवारे यांनी केले.

गाव तेथे वीज असा शासनाचा कार्यक्रम असून विजेपासून कोणीही वंचित राहू नये यासाठी कंपनीने घरपोच वीज जोडणी देण्याचा कार्यक्रम हाती घेतला असून याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा, असे अधीक्षक अभियंता श्री. एम.एस.केळे यांनी आपल्या भाषणात सांगितले. यावेळी ग्राहक तक्रार मंचच्या सदस्या सौ. गौरी चंद्रायन व कार्यकारी अभियंता श्री. प्रशांत दानोलीकर यांनीही आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमास कार्यकारी अभियंते सर्वश्री. अरविंद भादिकर, डी.बी.अंबादे, उपकार्यकारी अभियंते सर्वश्री चंद्रकांत देशमुख, डी.ए. हिवरकर, सौ. दिपाली माडेलवार, कनिष्ठ अभियंता श्री. आर. आर. मेश्राम तसेच इतर कर्मचारी व वीज ग्राहक उपस्थित होते.

## लातूरात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

लातूर येथील महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांची ८९ वी जयंती साजरी करण्यात आली. संघटनेचे मंडळ अध्यक्ष श्री. प्रमोद सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संघटनेचे सचिव श्री. डी.के. गवळी, विभागीय अध्यक्ष श्री. सत्यप्रकाश कांबळे, इतर कायकर्ते सर्वश्री डी. एम. कापरे, अशोक सूर्यवंशी, सिध्दार्थ कुसभागे, आर.आर. सोनवणे, एम.एस. मुळजे, एन.एम. पठाण, संजीव सूर्यवंशी इ. उपस्थित होते.

## व्यवस्थापवीय संचालकांची नांदेड शहर उपविभागास भेट



नांदेड शहर उपविभागीय कार्यालयात अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता. सोबत कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे, मुख्य अभियंता श्री. रामराव मुंडे व इतर.

नांदेड शहरातील वीजगळती सुमारे ३५ टक्के आहे. ही वीज गळती १५ टक्क्यांपर्यंत कमी करावी असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता यांनी नांदेड येथील बैठकीत केले. नांदेड शहर उपविभागीय कार्यालयास श्री. मेहता यांनी नुकतीच भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. त्यावेळी अधिकारी व कर्मचा-यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

वीजगळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांविषयी बोलताना श्री. मेहता म्हणाले की, बंद व मंद गतीने चालणारे मीटर बदलण्यासाठी विशेष मोहीम उघडून शहरातील अशा प्रकारचे मीटर त्वरित बदलून टाकावेत. वीजचोरी विरूध्दची मोहीम सतत चालू ठेवून वीजचोरांवर कारवाई करा. वीज जोडण्या व घरांचे प्रमाण विषम आढळल्यास वीजजोडणी न घेतलेल्या वीजग्राहकांना वीज जोडण्या द्या. घराच्या संख्येइतक्या वीजजोडण्या दिल्या जातील यासाठी प्रयत्न करा. रोहित्रांवर मीटर बसवून वीज वापराचा ताळमेळ ठेवा. वीजमीटरचे उत्पादन करणा-या कंपन्यांनी पुरविलेले मीटर दोषी आढळल्यास त्यासंबंधी त्वरित मुख्य कार्यालयास कळवा.

याबरोबरच वीजग्राहकांना अखंडित व योग्य दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी अतिभारित रोहित्रांचा शोध घेवून ते त्वरित बदला आणि ते अन्य ठिकाणी वापरा. याबरोबरच नादुरूस्त रोहीत्र लगेच निकामी न ठरवता त्याची तपासणी करून अन्यत्र वापरा. तसेच कार्यालयांच्या व विद्युत उपकेंद्रांच्या आवारात पडून असलेल्या भंगाराची त्वरित विल्हेवाट लावा, अशाही सूचना श्री. मेहता यांनी यावेळी अधिकारी व कर्मचा-यांना दिल्या.

या भेटीप्रसंगी नांदेड शहर विभागातील उच्चस्तर लिपिक श्री. एम. आर. जाधव यांच्या वीजचोरी विरोधी मोहिमेतील कामाचे कौतुक त्यांनी केले. कर्मचा-यांना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्य अभियंत्यांनी महिन्यातून एक दिवस ठरवून त्यांच्या चांगल्या कामाचे कौतुक भेट वस्तू किंवा प्रशस्तीपत्र देऊन करावे असाही आदेश व्यवस्थापकीय संचालकांनी यावेळी दिला.

यावेळी श्री. मेहता यांनी ग्राहक सुविधा केंद्रास भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली आणि ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच लुधियाना पॅटर्नच्या धर्तीवर वीज खांबावर बसविण्यात आलेल्या मीटरची पाहणी करून त्या विषयी समाधान व्यक्त केले.

कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे, नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. रामराव मुंडे, अधीक्षक अभियंता श्री. प्रल्हाद भारती, नांदेड विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. एम.ए.शेख, सहाय्यक अभियंता श्री.ए.के. इनामदार, कनिष्ठ अभियंता श्री. नारायण चव्हाण आदि अधिकारी त्यांचे समवेत उपस्थित होते.

# Think Over it.....




**"Pleasure is flower that fades; remembrance is the lasting perfume".**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना.

शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००८/१२६४/प्र.क्र.४३७/०८/सहा, दि.१३/०५/२००९ व शासन परिपत्रक क्र.केमाअ २००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा,दि.१३.०५.२००९ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ अंतर्गत शासनास पाठविण्यात येणारी माहिती अनावश्यकरित्या सामान्य प्रशासन विभागास पृष्ठांकित केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे मनुष्यबळ, स्टेशनरी, कार्यालयीन वेळ व टपालखर्च इत्यादी संसाधनावर अनावश्यक ताण पडतो. त्याचप्रमाणे, अर्जदाराशी करण्यात येणा-या पत्रव्यवहारावर कार्यालयाचा/जन माहिती अधिका-यांचा पूर्ण पत्ता/दूरध्वनी क्रमांक/उपलब्ध असल्यास फॅक्स क्रमांक/ई-मेल आयडी इत्यादी बाबी नमूद केलेल्या नसल्याचेही शासनाच्या निदर्शनास आले आहे.
सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, संदर्भिय शासन परिपत्रकांचे अवलोकन करुन माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ ची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्याच्या दृष्टीने सूचनांचे पालन करावे.
(प्रशासकीय परिपत्रक क्र. २३६ दिनांक २१/०७/२००९)

2. Extending the benefit of grant of one advance increment to the employees who possess the Post Graduate qualification.

The Managing Director in consultation with Director (Finance), Director (Operations) and Director (Projects) has accorded approval to grant one advance increment to the employees of the Company who acquired the Post Graduate qualification prior to their joining the Company before 16/09/2008.
However, such employees are entitled to one advance increment w.e.f. 16/09/2008 only, even if the Post Graduate qualification is acquired by them prior to 16/09/2008.
The cadres and respective courses i.e. Post Graduate Degrees for the purpose of granting one advance increment shall be the same as mentioned under Para-2 of the Adm.Circular No.182 dated 13/10/2008.

The benefit of one advance increment shall be granted only once in the entire service period.
(ADMINISTRATIVE CIRCULAR NO. 238 DATED 24/07/2009)

३. मृत कर्मचा-याच्या अवलंबितांस/वयाची ५० वर्षेपूर्ण होण्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणा-या कर्मचा-यांच्या अवलंबितास सुधारपत्र क्र. २८, दिनांक १६/०४/१९७५ अंतर्गत अनुकंपा तत्वावर महावितरण कंपनीत नोकरी देणेबाबत, अर्ज करण्यासाठी ५ वर्षाच्या मुदतीत वाढ करणेबाबत.

व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (संचालन) यांच्याशी विचारविनिमय करुन म.रा.वि.मंडळ वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम १९६१ च्या परिशिष्ट 'ज' मधील नियम क्र.५ खालीलप्रमाणे सुधारीत करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

नियम क्र.५ : मृत कर्मचा-याच्या अवलंबितास/वयाची ५० वर्षेपूर्ण होण्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या विधवेस/विधुरास/मुलीस/मुलास तो/ती शैक्षणिकदृष्ट्या पात्र असल्यास त्या पदावर तीस/त्यास नियुक्ती देण्याचा विचार केला जाऊ शकेल. मात्र त्यासाठी त्याने/तीने कर्मचा-याच्या मृत्यूच्या तारखेपासून १० (दहा) वर्षाच्या आत अर्ज करणे बंधनकारक राहील. जर मृत कर्मचा-याची मुले त्याच्या मृत्यू समयी सज्ञान नसतील तर अशा प्रकरणी ती सज्ञान झाल्यानंतर १० (दहा) वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करु शकतील.

टीप :

१) उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत कोणत्याही कारणास्तव अवलंबिताकडून अर्ज सादर न झाल्यास त्याचा/तिचा सदर योजनेखाली नोकरी मिळण्याबाबतचा हक्क आपोआप समाप्त होईल.

२) वरील नियमावलीसाठी कुटुंब म्हणजे मृत कर्मचा-याची पत्नी/पती/मुले/अविवाहित मुली आणि अवलंबित भाऊ व बहीण.
(प्रशासकीय परिपत्रक क्र. २३९ दिनांक २०/०८/२००९)

**B. R. Dhawale**
**MA, MPM, LLB, DLL, DCS**
**General Manager (P-DC)**

## प्रशासकीय वृत्त

### बदली

| नाव | पदनाम | सध्याचे कार्यालय | बदलीनंतरचे कार्यालय |
|---|---|---|---|
| श्री. ए. एन. रणखांबे | अधीक्षक अभियंता | कार्यकारी संचालक -२ यांचे कार्यालय, पुणे | अंतर्गत सुधारणा विभाग, मुख्यालय, मुंबई |
| श्री. एस. के. वडोदकर | अधीक्षक अभियंता | व्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालय, मुख्यालय, मुंबई | कार्यकारी संचालक -२ यांचे कार्यालय, पुणे |
| श्री. एस. एम. राठोर | अधीक्षक अभियंता | भार व्यवस्थापन विभाग मुख्यालय, मुंबई | वसई सं. व सु. मंडल |
| श्री. एस. के. ताकसांडे | अधीक्षक अभियंता | भार व्यवस्थापन विभाग मुख्यालय, मुंबई | पायाभूत विकास आराखडा विभाग, मुख्यालय, मुंबई |

# भारनियमन संपुष्टात आणण्यासाठी जादा विद्युत निर्मितीचे नियोजन : मुख्यमंत्री



नांदेड परिमंडल कार्यालयाच्या उद्‌घाटन प्रसंगी मुख्यमंत्री ना. अशोकराव चव्हाण, खासदार भास्करराव खतगावकर, व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता, कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे, श्री.अनिल खापर्डे व इतर.

राज्यातील भारनियमन संपुष्टात आणण्यासाठी दरवर्षी जादा विद्युत निर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच जनतेला अधिकाअधिक चांगली सेवा देण्यासाठी ऊर्जा क्षेत्रात कार्यक्षमता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री ना. अशोक चव्हाण यांनी केले. महावितरणने नव्याने मंजूर केलेल्या नांदेड परिमंडल कार्यालयाचे उद्‌घाटन मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, मागणी आणि पुरवठयातील दरी दिवसेंदिवस कमी होत आहे, ही समाधानाची बाब आहे. भारनियमनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जनतेने विजेचा अनावश्यक वापर टाळावा. त्याचप्रमाणे अपारंपारिक ऊर्जा साधनांचाही वापर वाढवावा, असेही आवाहन त्यांनी केले.

वीज क्षेत्रातील स्पर्धेचा उल्लेख करुन मुख्यमंत्री म्हणाले की, महावितरण या शासकीय कंपनीची विश्वासार्हता अधिक आहे. त्यामुळे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी या कंपनीने अधिक कार्यक्षमतेने काम करावे. निर्मिती, वितरण आणि पारेषण या तिन्ही कंपन्यांच्या कामाबद्दल त्यांनी गौरवोद्‌गार काढले. गावठाण फिडर सेपरेशन व सिंगल फेजिंग योजनांमुळे शेतकऱ्यांचा व गावकऱ्यांचा फायदा झाला. त्यासाठी १२६ कोटींचा निधी अर्थसंकल्पात उपलब्ध करून देण्यात आला आहे. पायाभूत आराखडा विकास कार्यक्रमांतर्गत राज्यभरात ५६५ विद्युत उपकेंद्रांची आणि ६२ हजार रोहित्रांची उभारणी करण्यात येणार आहे.

खासदार श्री. भास्करराव पाटील खतगांवकर यांचेही याप्रसंगी भाषण झाले. नव्या परिमंडलाच्या माध्यमातून जनतेला चांगली सेवा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अधीक्षक अभियंता श्री. पी. आर. भारती यांच्या चांगल्या कामगिरीचे त्यांनी यावेळी कौतुक केले.

प्रास्ताविकात व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय मेहता म्हणाले, ग्राहकांना चांगली सेवा देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार नवे परिमंडल निर्माण करण्यात आले आहे. लातूर आणि औरंगाबाद या परिमंडलांचे विघटन करून नांदेड परिमंडलाची स्थापना करण्यात आली आहे. या परिमंडलात नांदेड, हिंगोली व परभणी या जिल्ह्यांचा समावेश राहील. येत्या दीड ते दोन वर्षात वीज जाळयांचे बळकटीकरण करून शेतीसाठी मागेल त्याला वीज उपलब्ध करुन देण्यात येईल.

कार्यक्रमाला महापौर श्री. प्रकाश मुथा, जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. वैशालीताई चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकर परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. श्रावण हर्डीकर, आयुक्त डॉ. दिपक म्हैसेकर, कार्यकारी संचालक श्री. उत्तम झाल्टे व श्री.अनिल खापर्डे, मुख्य अभियंता श्री. रामराव मुंडे आदी उपस्थित होते.

## श्री.दत्तात्रय वाव्हळ
## नवे संचालक (वित्त)



श्री.दत्तात्रय वाव्हळ

श्री.दत्तात्रय धर्माजी वाव्हळ यांची संचालक (वित्त) म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी दि.२० ऑगस्ट २००९ रोजी आपल्या पदाची सुत्रे ग्रहण केली. महावितरणने जाहिरात देऊन खुल्या स्पर्धेच्या माध्यमातून ही नेमणूक केली आहे. श्री.वाव्हळ हे या पूर्वी ठाणे येथे कोंकण पाटबंधारे विकास महामंडळात मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर कार्यरत होते.

मूळचे पुणे जिल्ह्याचे रहिवाशी असलेले श्री.वाव्हळ हे वाणिज्य शाखेचे पदवीधर असून त्यांनी १९८२ साली पुणे विद्यापीठातून एल.एल.बी. ची पदवीही संपादन केली. त्यात ते गुणानुक्रमे प्रथम आले होते. याशिवाय त्यांनी माहिती तंत्रज्ञान शाखेतील पदविकाही प्राप्त केलेली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून श्री.वाव्हळ यांनी १९८३ साली महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी सिंधुदुर्ग व ठाणे जिल्हा परिषद, ठाणे महानगरपालिका, धर्मादाय आयुक्त कार्यालय, जागतिक बँकेचा महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ इत्यादी आस्थापनांमध्ये वरिष्ठ पदांवर काम केलेले आहे. एएससीआय, हैद्राबाद, यशदा, पुणे तसेच कॅनडा मधील मॉंट्रीयल येथे त्यांनी वित्त व्यवस्थापन आणि विश्वबँक प्रकल्पाच्या संदर्भातील विशेष प्रशिक्षण घेतले आहे.

## नवे संचालक(प्रकल्प)
## श्री. मारुती देवरे



श्री. मारुती देवरे

कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) श्री. मारुती देवरे यांची संचालक (प्रकल्प) या पदावर नियुक्ती झाली असून त्यांनी आपल्या नव्या पदाची सूत्रे दि. २९ ऑगस्ट रोजी ग्रहण केली.

मूळचे औरंगाबाद जिल्हयाचे रहिवासी असलेले श्री. देवरे यांनी बी.ई. (इलेक्ट्रीकल) पदवी संपादन केल्यानंतर ऑगस्ट १९७१ मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवेत पदार्पण केले. त्यानंतर सहाय्यक अभियंता ते मुख्य अभियंता अशा बढत्या घेत त्यांनी विविध ठिकाणी वितरण व पारेषण क्षेत्रातील विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. श्री. देवरे यांनी अमरावती, नागपूर आणि नाशिक येथे कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता अशा वरिष्ठ पदांवर काम केलेले आहे. नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून सुमारे अडीच वर्षे काम केल्यानंतर नोव्हेंबर २००८ पासून ते कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) म्हणून कार्यरत होते. सिंगल फेजिंग आणि स्वतंत्र गावठाण फिडर या योजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी यात श्री. देवरे यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

Printed & Published by Shri Ramdas Sampat Dotonde of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at **Printography Systems (India) Pvt. Ltd.,**
28, Mumbai Samachar Marg, Raja Bahadur Building, First Floor, Fort, Mumbai - 400 023.
& Published at Hongkong Bank Building, M.G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : **राम दोतोंडे**
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)